**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सह शहर अभियंता (विद्युत /यांत्रिकी) विभाग यांचे कार्यालय निविदा क्र. ६/२०१०-२०११**
**खालील नमूद केलेल्या कामाकरीता पी.डब्ल्यु.डी./ सी. पी.डब्ल्यु.डी /एम.इ.एस./रेल्वे यांचेकडे योग्य त्या वर्गात पंजीकृत असलेल्या तसेच मनपा विद्युत विभागाकडे ई-टेंडरींग नोंदणीकृत असलेल्या ठेकेदाराकडून प्रतिशत दराची बी-१ निविदा ई-टेंडरींग पद्धतीने मागविणेत येत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रूपये | **बयाणा र.रु.** | **अनामत र.रु** | **फॉर्म फी र.रु.** | **कामाची मुदत** | **नोंदणी दर्जा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | औध - रावेत रस्त्यावरील साई चौक ते डांगेचौकापर्यंत महा पारेषण कंपनीची अति उच्चदाब वाहिनी ( १३२ kv) हलविणे. | १,८८,५९,०९२/- | १,८८,५९०/- | ९,४२,९५५/- | ४,०००/- | ६ महिने | अ |

सदर निविदेतील अनामत रक्कम व नियम, अटी, निविदा शेड्युल इत्यादींची माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या ई - टेंडरिंग पद्धतीने मनपाच्या वेबसाईटवरुन भरावयाची आहे. सदरची ई - टेंडरिंग प्रक्रियेअंतर्गत सदरचे कामासाठी निविदा दिनांक ०२/०९/२०१० ते दिनांक ०९/०९/२०१० दु.३.०० वा. ई - टेंडरिंग पद्धतीने वेबसाईटवरुन भरता येईल. सदर कामासाठी निविदापुर्व सभा दिनांक ६/०९/२०१० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा. सह शहर अभियंता यांच्या कार्यालयात होईल.

जे निविदाधारक ई - टेंडरिंग प्रक्रियेअंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे.त्यांनाच निविदा भरता येईल. निविदाधारकांनी निविदेची फॉर्म फी व बयाना रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टिम द्वारे (ई-बँकिंग) भरावयाची आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे गेटवे सिस्टिमद्वारे भरलेले पेंमेंट मनपाचे विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास अशा ठेकेदाराची निविदा अपात्र ठरल्यास त्याचे दायित्व मनपा वर राहणार नाही. निविदेमध्ये कोणताही बदल झालेस वेबसाईटवरुन प्रसिद्ध करणेत येईल. सदर निविदेचे फॉर्म विक्रीस ठेवणेत येणार नाहीत व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार नाही. याबाबत कोणतीही माहिती आवश्यक असलेस विद्युत विभागात लेखाधिकारी यांचेशी संपर्क साधावा.कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किवा अशंता : मंजुर करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-

**जाहिरात क्र. १५६**
क्र. विद्युत /नि/१अ/ कावि/३०५/२०१०, दि. ०२/०९/२०१०.

**सहशहर अभियंता (वि/यां)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८.

## विद्युत मुख्य कार्यालय निविदा नोटीस क्र . ६/ १०-११

### इतर अटी व शर्ती

१) सदर कामाकरिता पिंपरी चिंचवड मनपाचा ई टेंडरिंग नोंदणी दाखला आवश्यक आहे. .

२) निविदा दर निविदा उघडल्यापासुन १२० दिवस ग्राह्य राहतील.

३) जादा दराने मंजुर झालेल्या निविदेची ५% अनामत रक्कम ही निविदा रक्कम अधिक जादा दराने होणारी रक्कम या एकत्रित रकमेवर घेतली जाईल.

४) कामावर वापरलेले साहित्य कमी दर्जाचे आढळुन आल्यास असे साहित्य ठेकेदाराने स्वखर्चाने काढुन योग्य प्रतीचे साहित्याचा पुरवठा व उभारणी स्वखर्चाने करु द्यावी लागेल.

५) ज्या ठेकेदारांस उपरोक्त कामे देण्यात येतील अशा ठेकेदारांनी सदर कामांकरिता /कामावर वापरावयाच्या साहित्याकरिताचा (Contractors All Risk Insurance Policy) तसेच सदर कामे पूर्ण करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कामगांरांच्या च्कामगार नुकसान भरपाईछ विमा दि. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. विभागीय कार्यालय, खोजा हाऊस,केएसबी पंप समोर पिंपरी पुणे १८ यांचेकडे उतरविणे बंधनकारक असुन कामाचे आदेश देण्यापुर्वी अथवा प्रथम बील अदायगी पूर्वी तत्संबधीत कागदपत्रे मुळ प्रतीत सादर करावी लागतील.

६) कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्टखालील तरतुदींचे पालन करणे ठेकेदारावर बंधणकारक राहील, The Contractor Labour (रेग्युलेशन ॲंड अबॉजिशन) एक्ट १९७० नियम १२ अंतर्गत ज्या कामासाठी वीस अथवा त्याहुन अधिक कामगार लागणार आहेत त्यांना कामगार कार्यालय, पुणे यांचे लायसन्स घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार लायसन्स घेवून ते संबधित अभियंत्यंकडे सादर करणे बंधणकारक राहील व सदरचे लायसन्स घतल्याशिवाय कामाची सुरुवात करता येणार नाही. ज्या ठेकेदार एजन्सीज यांना सदर प्रमाणपत्र काढणेची आवश्यकता नसेल तर त्यांनी स्वत:चे जबाबदारीवर र.रु १००/- सॅंटम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराइज करुन सादर करावे.

७) कामाच्या आदेशाच्या तारखेपासून ते काम पूर्ण करून कामाचा हमी कालावधी संपेपर्यंत, निविदा अटी शर्तीनुसार आणि निविदा सर्वसाधारण अटीशर्तीनुसार काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

८) सदर कामावर महानगरपालिका व म.रा.वि.पा.कं.लि., अभियंत्याचे संयुक्त पर्यवेक्षण राहील. तसेच अशा कामावर गुणवत्ता नियंत्रण ठेवणेकरिता त्रयसंथ संस्थेची नेमणुक करण्यात येईल. ठेकेदाराने कामाची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने वरील अभियंत्याकडून दैनंदिन तपासणी करणे बंधनकारक राहील. पर्यवेक्षणाकरिता त्रयसंथ संसंथेस सहकार्य करणे व त्यांच्या सूचनांचे पालन करणे बंधणकारक राहील. सदर बाबतीत तक्रार आल्यास संबधीत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.

९) कोणतेही कारण न देता, कोणत्याही निविदा स्विकारणेचा/नाकारण्याचा हक्क मा. आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे. अटीयुक्त निविदा स्वीकारली जाणार नाही.

१०) कामावर उपयोगात आणलेल्या साहित्यांचे पुरवठाधारकाकडील चलन बीलासोबत जोडणे आवश्यक आहे. मनपा हद्दीबाहेरील साहित्याची चलने असल्यास त्याबाबत जकात भरल्याची पावती जोडावी तसे न आढळल्यास बीलातुन नियमानुसार जकात वसुल करण्यात येईल.

११) सदर कामासाठी घेणेत येणारी अनामत रक्कम ही त्या कामाचा DEFECT LIABILITY PERIOD संपलेनंतर पुर्णांशाने परत करणेत येईल. या कामासाठी DEFECT LIABILITY PERIOD ३० महिन्यांचा राहिल. तसेच आवश्यकते प्रमाणे साहित्याची शासकीय प्रयोगशाळेकडून तांत्रिक तपासणी ठेकेदाराने स्वखर्चाने करुन तपासणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.तसेच सदर कामावर वापरायोग्य साहित्याचे उत्पादीत कंपनीमध्ये विभागाचे प्रतिनीधी मार्फत तांत्रिक तपासणी, कंपनीकडील तांत्रिक क्षमता प्रमाणपत्र तसेच विद्युत कामाचा दर्जा इंडियन इलेक्ट्रिसिटीनुसार नियमानुसार राखुन सदर काम चालू करणेस योग्य असलेबाबतचा दाखला विद्युत निरिक्षक, सां.बा. यांचे कडून स्वखर्चाने सादर करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच काम पुर्णत्वानंतर काम कार्यान्वित करुन म.रा.वि.पा.कं.लि. हस्तांतरीत करणेची समुचित जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

१२) सदरचे काम दिलेल्या मुदतीत पुर्ण न केल्यास त्यास अथवा काम पुर्ण करणेस ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे विलंब झाल्याचे निर्देशनास आल्यास कामांची मुदत संपलेच्या तारखेपासुन प्रतिदिन योग्य ती रक्कम दंड म्हणुन कोणतेही कारण, कोणतीही सबब विचारात न घेता आकारण्यात येईल.

१३)महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. यांच्याकडून समन्वय साधुन ठेकेदाराने कामाचे मार्किंग करुन घेणे त्याबरोबर म.रा.वि.पा.कंपनीच्या मंजुर अंदाज पत्रकावर नियमानुसार येणारे वीज परिवेक्षण शुल्क स्व:खर्चाने अदा करणेची जबाबदारी ठेकेदारांची राहील. तसेच वेळोवेळी म.रा.वि.पा.कं.लि. कडून शटडाऊन घेणे (लाईन बंद करुन घेणे) ही सम्मुचित जबाबदारी ठेकेदारांची राहिल.

१४) सदर कामाकरीता महापारेषण कंपनीचे प्रचलीत नियमानूसार केलेल्या कामाची गुणवत्तेची हमी ३० महिन्यांकरीता स्टॅम्प पेपरवर लिहून देणे ठेकेदारावर बंधनकारक असल्याने काम पुर्णत्वानंतर कराव्या लागणा-या देखभाल दुरुस्तीची कामे ८ तासांच्या आत पूर्ण करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. अन्यथा दंड वसूल करण्याचे अधिकार आणि कायदेशीर कारवाई करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना रहातील.

१५) सदर कामाचे हमी कालावधीसाठी करावयाच्या देखभाल दुरुस्तीच्या दृष्टीने राखून ठेवण्यात आलेली मुळ अनामत रक्कम काम पूर्ण झालेच्या दिनांकापासून ३० महिने मनपाकडे ठेवण्यात येईल

१६) सदर कामावर वापरावयाच्या साहित्याकरीता ३० महिने इतकी हमी व कामाचे गुणवत्तेबद्दल ३० महिने हमी र.रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर निविदा प्राप्त झालेल्या निविदाधारकास अधिकृत नोटरी यांचे कडून प्रतिज्ञापत्र करुन द्यावे लागेल. सदरचे हमी काम कार्यान्वयीत करुन हस्तांतरण तारखेपासून समजणेत येईल.

१७) सदर कामावर महानगरपालिका व म.रा.वि.पा.कं.लि. अभियंत्यांचे संयुक्त पर्यवेक्षण राहील. ठेकेदाराने कामाची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने वरील अभियंत्यांकडून दैनंदीन तपासणी करणे बंधनकारक राहील. पर्यवेक्षणाकरीता सहकार्य करणे व त्यांच्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर बाबतीत तक्रार आल्यास सदर ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करणेत येईल.

१८) सदर कामासाठी कामावर वापरावयाच्या साहित्याची तांत्रीक तपासणी संबंधीत उत्पादकाच्या उत्पादनस्थळाच्या ठिकाणी महानगरपालिका, विज मंडळ यांच्या प्रतिनिधी समक्ष स्वखर्चाने करुन देणे ठेकेदाकावर बंधनकारक राहील. तसेच आवश्यकता वाटल्यास साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळेकडून स्वखर्चाने करुन क्षमता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदारावर राहील. मराविपा कं.लि. चे त्यांचे युनिट मार्फत साहित्याची तपासणी करावयाची मागणी केल्यास स्वखर्चाने ती करुन घेणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. टॉवर फाऊंडेशन पुर्ण झालेनंतर साहित्याच्या बिलापोटी अंदाजपत्रकीय दराच्या ५७ टक्के इतकी रक्कम अदा केली जाईल. तथापी त्यापूर्वी साहित्याची तांत्रीक तपासणी मराविपा कं. लि. व मनपा अभियंत्याकडून झाली असली पाहीजे. व आवश्यक प्रमाणपत्रे किंवा चाचणी अहवाल प्राप्त झाले असले पाहिजेत.

१९) सदरच्या कामासाठी केवळ असाधरण परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येईल. नियोजीत कामाचा आराखडा व नकाशे मराविपा कं. लि. व विद्युत निरिक्षक यांच्या कार्यालयाकडून ते मंजूर करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. सदर काम ऑर्डर मिळाल्यापासून १५ दिवसांत सुरू करणे बंधनकारक राहील. काम करत असताना मनपाच्या तसेच मराविपा कं.लि. च्या अभियंत्यासी समन्वय राखण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच काम पुर्णत्वानंतर सदर कामाचे विद्युत निरिक्षण सदर खात्याकडून स्वखर्चाने करुन समाधनकारक दाखला उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच वेळोवळी कामासाठी मराविपा कं. लि. चा वीज पुरवठा बंद करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. संपुर्ण पारेषण व्यवस्था मराविपा कं. लि. कडून चालू करुन ती आवश्यक कागदपत्रांसह मराविपा कं. लि. हस्तांतरीत करुन त्याची पोहोच मनापाकडे देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. सदर व्यवस्था मराविपा कं. लि. कडे हस्तांतरीत केले नंतरच अंतिम बील अदा करणेत येईल.

२०) **निविदा दरापेक्षा कमी दराची विनिदा असल्यास त्या निविदेतील कामे पूर्ण करण्यासाठी ज्यादा बाबी करणे क्रमपात्र ठरल्यास जादा बाबींचे काम निविदा स्वीकृत दरामध्ये करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.तसेच निविदा शेड्युल दरापेक्षा निविदा जादा दराची असल्यास जादा बाबींचे काम निविदा दराने करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.**

२१) शासनाने लागु केलेला सेवाकर व सर्व प्रकारचे कर भरणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२२) विद्युत कामाचा दर्जा IE Rules नुसार राखून सदर काम कार्यान्वीत करणेस योग्य असलेबाबतचा दाखला विद्युत निरिक्षक सां.बा. विभाग यांचेकडून स्वखर्चाने सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

२३) महापारेषण कंपनी यांचेशी समन्वय साधून कामाचे अंदाजपत्रक मंजूर करुन घेणे तसेच मंजूर अंदाजपत्रकावर नियमानूसार येणारे वीज पर्यवेक्षण शुल्क स्वखर्चाने अदा करणे तसेच कामाकरीता आवश्यक OUTAGE घेणेची संर्पुजबाबदारी ठेकेदाराची राहील.

२४) सदर कामामध्ये सेवा वाहिन्या टाकण्याच्या बाबीच्या दरामध्ये सदर सेवा वाहिन्यासाठी खोदण्यात आलेले चर मानांकानूसार पुर्ववत करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. खोदलेले चर पुर्ववत करण्यासाठी मनपा वेगळा खर्च अदा करणार नाही.

---

**निविदा पुर्व सभा दि ०६/०९/२०१० वेळ स. ११ वा.** **निविदा स्विकृती दिनांक २/०९/२०१० ते ९/०९/२०१० दु. ३ वा.**

मा. सह शहर अभियंता (वि/यां)
विद्युत मुख्य कार्यालय

---

**जाहिरात क्रमांक** - १५६
क्र.विद्युत/नि/१अ/कावि/३०५ /१० दिनांक - २/०९/२०१०.

**सह शहर अभियंता (वि/यां)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका